नियमित दिवाणी दावा क्रमांक १६/१४.
सरस्वताबाई -वि.- रविंद्र

# निशांणी क्रमांक ५ वरील आदेश

(दिनांक १५.१२.२०१४)

१. जाहीरनामा, वाटणी व कायमच्या मनाई हुकुमासाठीच्या दाव्यात वादी, सरस्वताबाई संपतराव भोयरने आपला मयत भाउ सदाशिव खोडके याची विधवा पत्नी, दोन मुलगे व तीन मुलींविरूध्द तसेच प्रतिवादी क्र.७ हिराबाई रतन पोतदार विरूध्द सदर दाव्याचा अंतीम निकाल लागे पावेतो त्यांनी दावा मिळकत सर्वे क्र.८९/१, ८४, १३/२ व ३१ या मिळकतींमध्ये त्रयस्थांचे हितसंबंध निर्माण करू नये असा तात्पुरता मनाई हुकुम मिळण्यासाठी सदरचा अर्ज दिवाणी प्रकीया संहितेच्या क्रम ३९ नियम १ प्रमाणे दाखल केलेला आहे. वादीच्या मते सदर मिळकती वडिलोपार्जीत मिळकती आहेत. सन २००७ मध्ये प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी विनंती केल्याप्रमाणे त्यांच्या आर्थीक अडचणीचा व त्यांच्याशी असलेल्या संबंधाचा विचार करून, वादीने दावा मिळकत सर्वे क्र.१३ मधील काही जमीन विकण्यास परवानगी दिली. त्याप्रमाणे वादी व प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी मिळून दि.२६.१२.२००७ रोजी पंजीकृत खरेदीखताद्वारे सर्वे क्र.१३ मधील काही जमीन सुनील चिधंबाजी ठाकरे यास विकली. त्यानंतर फेब्रुवारी २०१४ मध्ये प्रतिवादी क्र.१ ते ६ वादीच्या संमती शिवाय व तीला माहीत पडू न देता परस्पर दावा मिळकतींची विल्हेवाट लावण्याच्या विचारात असल्याचे समजले. त्याबाबत अधिक चौकशी केली असता, वादीस असे समजले की, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी दावा मिळकत सर्वे क्र.३१ बाबत प्रतिवादी क्र.७ च्या लाभात वादीच्या संमती शिवाय परस्पर पंजीकृत खरेदीखत करून दिलेले आहे. तसेच खोटया व बनावट हक्कसोडपत्राच्या आधारे त्यांनी वादीच्या नावाची नोंद

देखील कमी करून घेतलेली आहे. प्रत्यक्षात वादीने असे कोणतेही हक्कसोड पत्र कधीही कोणाच्याही लाभात करून दिलेले नाही. त्याबाबत वादीने अधिक चौकशी केली असता, तीच्या असे लक्षात आले की, प्रतिवादी क्र.१ ते ६ यांनी दि.२६.१२.२००७ रोजी सुनील ठाकरे याचे लाभात पंजीकृत खरेदीखत करून देते वेळी बेकायदेशीरपणे व वादीस त्याबाबत कल्पना न देता खोटया व बनावट हक्कसोड पत्रावर देखील तीच्या अशिक्षीतपणाचा गैरफायदा घेवून तीच्या अंगठयाचे निशान घेवून घेतले व त्या दस्ताच्या आधारे आता ते वादीचा कायदेशीर वारसाहक्क डावलू पाहत आहेत.  सबब, सदर प्रतिवादी क्र.७ च्या लाभातील कथीत पंजीकृत खरेदीखत व प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या लाभातील कथीत हक्कसोड पत्राचा लेख बेकायदेशीर असल्याचे जाहीर होवून मिळण्यासाठी वादीने सदरचा दावा दाखल केलेला असुन, प्रतिवादींनी त्रयस्थाचे हितसंबंध निर्माण करू नये असा तात्पुरता मनाई हुकुम मिळण्याची विनंती केलेली आहे.

२.  प्रतिवादी क्र.१ व २ यांनी नि.क्र.३१ प्रमाणे प्रतिवादी क्र.३ ते ६ यांनी नि.क्र.३४ प्रमाणे व प्रतिवादी क्र.७ ने नि.क्र.२८ प्रमाणे आपले लेखी खुलासे दाखल करून सदर अर्जास तीव्र आक्षेप घेतलेला आहे. प्रतिवादींच्या मते दावा मिळकत सर्वे क्र.१३/२ व सर्वे क्र.३१ ही त्यांची वडिलोपार्जीत मिळकत असुन, दावा मिळकत सर्वे क्र.८९/१ व ८४ ही मयत सदाशिव उकरर्डाजी खोडके यांची स्वकष्टार्जीत मिळकत होती व त्यांच्या मृत्यूनंतर वारस या नात्याने त्या मिळकती प्रतिवादी क्र.१ ते ६ यांच्या नावे राजस्व दप्तरी नोंद करण्यात आलेल्या आहेत. दावा मिळकत सर्वे क्र.८४ व ८९/१ यांच्यात वादीचा कोणताही हक्क व अधिकार नाही. तसेच दावा मिळकत सर्वे क्र.१३/२ व ३१ मधील आपला वारसाहक्क वादीने स्वेच्छेने पंजीकृत हक्कसोडपत्राद्वारे प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या लाभात सोडून दिलेला

आहे. त्याचप्रमाणे सदर दस्ताद्वारे प्रतिवादी क्र.४ ते ६ यांनी देखील त्यांचा दावा मिळकत सर्वे क्र.१३/२, ३१ व त्याचप्रमाणे सर्वे क्र.८९/१ व ८४ या मिळकतींमधील वारसाहक्क देखील प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या लाभात सोडून दिलेला आहे. त्यामुळे आता वादी व प्रतिवादी क्र.४ ते ६ यांच्यात सदर चारही दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्क व अधिकार राहीलेला नाही. मात्र, दावा मिळकती नागपूर येथील मिहान प्रकल्पाअंतर्गत येत असल्यामुळे त्यांच्या किमतीत वाढ झालेली असल्यामुळे वादीने लोभात पडून सदरचा दावा व अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र.७ च्या मते तीने खरेदीखत करण्यापुर्वी योग्य ती चौकशी केली असल्यामुळे ती प्रामाणीक खरेदीदार असुन, वादीचा अर्ज नामंजुर होण्यास पात्र ठरतो. विकल्पेकरून तीने असे देखील प्रतिकथन केलेले आहे की, सदर मिळकत वडिलोपार्जीत असल्याचे न्यायालयाने ठरविल्यास निदान प्रतिवादी क्र.१ ते ६ यांच्या हिश्श्यापुरते तरी, तीचे खरेदीखत कायदेशीर ठरविण्यात यावे. सबब, सर्व प्रतिवादींनी सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

३.      मी वादीतर्फे वकिल श्री किंर्देले व प्रतिवादी क्र.१ व २ तर्फे वकिल श्री वंजारी, प्रतिवादी क्र.३ ते ६ तर्फे त्यांचे वकिल श्री थोटे व प्रतिवादी क्र.७ तर्फे तीचे वकिल श्री. नाकाडे यांचा युक्तीवाद ऐकला व अभिलेखाचे वाचन केले. सदर अर्जाच्या न्यायानिर्णयासाठी माझया समक्ष खालील मुद्दे उपस्थित झालेले असुन त्यांचे निष्कर्ष कारणमिमासेसह मी खालीलप्रमाणे नमुद करीत आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- |
| १. वादीस प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे त्यांनी सिध्द केले आहे काय? | .... अंशतः होकारार्थी |

२. तात्पुरता मनाई हुकूम नामंजुर केल्यास वादींचे
अपरिमित नुकसान होणार आहे काय? .... अंशत: होकारार्थी

३. न्यायाचे समतोलत्व वादींच्या लाभात आहे काय?... अंशत: होकारार्थी

४. आदेश काय? अंतीम आदेशाप्रमाणे

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ साठी (प्रथमदर्शनी प्रकरण)**

४. वादीस प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे सिध्द करण्यासाठी तीने हे प्रथमदर्शनी सिध्द करणे आवश्यक आहे की, तीला दावा मिळकत सर्वे क्र. ८९/१, ८४, १३/२ व ३१ या मिळकतींमध्ये किंवा त्यापैकी कोणत्याही मिळकतीमध्ये वारसाहक्क असुन, तो तीने कोणाच्याही लाभात हक्कसोडपत्राद्वारे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे सोडून दिलेला नसुन, प्रतिवादी क्र.१ ते ६ खोटया व बनावट दस्ताच्या आधारे तीने हक्क सोडल्याचे दाखविण्याच्या व त्या आधारे दावा मिळकतींची परस्पर विल्हेवाट लावण्याच्या प्रयत्नात आहेत.

५. आपल्या अर्जाच्या पुष्टयर्थ वादीने दावा मिळकतींच्या सात बारा उता-यांच्या, गाव नमुना ८ अ च्या उता-यांच्या व नकाशांच्या सत्यप्रती, वादग्रस्त हक्कसोडपत्राची, विक्री पत्राची व सुनील ठाकरे याचे लाभातील विक्रीपत्राची छांयाकित प्रत, फेरफार नोंदी ईत्यादी दस्त दाखल केलेले आहेत. तर प्रतिवादी क्र.१ व २ यांनी त्यांचे वडिल सदाशिव यांच्या मृत्यूचा दाखला दावा मिळकतींच्या सात बारा उता-यांच्या सत्यप्रती, त्यांचे लाभातील विना मोबदला हक्कसोडपत्राची प्रत, फेरफार नोंदी, ईत्यादी दस्तांवर भिस्त ठेवलेली आहे. तर प्रतिवादी क्र.७ ने तीच्या लाभातील खरेदीखताच्या प्रतीवर भिस्त ठेवलेली आहे.

६.        या बाबत वाद उपस्थित करण्यात आलेला नाही की, दावा मिळकतींपैकी सर्वे क्र.१३/२ व ३१ या वडिलोपार्जीत मिळकती आहेत. मात्र, असे प्रतिकथन करण्यात आलेले आहे की, सदर मिळकतींमधील आपला वारसाहक्क वादीने विनामोबदला प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या लाभात सोडून दिलेला आहे. अभिलेखावर दाखल राजस्व दप्तरींच्या नोंदीवरून सुध्दा सदर दोन्ही मिळकती वडिलोपार्जीत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच सदर नोंदीवरून असे देखील प्रथमदर्शनी दिसून येते की, विनामोबदला हक्कसोडपत्राच्या दस्ताच्या आधारे वादी व प्रतिवादी क्र.४ ते ६ यांच्या नावाची नोंद कमी करण्यात आलेली आहे. परंतु हक्कसोडपत्राच्या दस्ताचे वाचन केले असता, असे प्रथमदर्शनी दिसून येते की, त्या दस्तात वादीने प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या लाभात आपला वारसाहक्क सोडून दिला असल्याचे स्पष्टपणे नमुद करण्यात आलेले नाही. तसेच त्या दस्ताच्या मजकुराचे पुर्णत: वाचन केले असता, असे दिसून येते की, त्यात असे नमुद करण्यात आलेले आहे की,सदर दस्त करून देणार व घेणार हे “ सख्खे बहीण भाउ’’ असुन त्यामुळे चारही दावा मिळकतींमधील आपला पुर्ण हिस्सा त्या आपल्या भावांच्या लाभात लिहून देत आहेत. येथे हे नमुद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादी क्र.१ व २ हे वादीचे भाउ नसुन भाचे आहेत. सदर दस्तामध्ये प्रतिवादी क्र.४ ते ६ यांना दस्त लिहून देणार संबोधण्यात आले असल्याचे त्यातील मजकुरावरून प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे खरोखरच वादीने सदर दस्ताद्वारे प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या लाभात आपला वारसाहक्क सोडून दिलेला आहे काय ? हा महत्वाचा प्रश्न निर्माण होतो व तो संपरिक्षेदरम्यान अधिक पुराव्याच्या प्रकाशात गुणवत्तेवर निकाली काढणे आवश्यक आहे. या संदर्भात तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज निकाली काढण्याच्या प्राथमिक पायरीवर अधिक मत नोंदवणे योग्य व न्यायोचित

ठरणार नाही.

७. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी प्रतिवादी क्र.७ च्या लाभात पंजीकृत खरेदीखत करून दिले असल्याचे खरेदीखताच्या प्रतीवरून प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे सदर मिळकतींमध्ये प्रतिवादी त्रयस्थाचे हितसंबंध निर्माण करू शकतात ही वादीने व्यक्त केलेली भिती साधार असल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते.

८. दावा मिळकतींपैकी सर्वे क्र.८९/१ व ८४ या मिळकती प्रतिवादी क्र.१ व २ व ४ ते ६ यांचे वडिल असलेल्या व प्रतिवादी क्र.३ चे पती असलेल्या मयत सदाशिव यांची स्वकष्टार्जीत मिळकत असल्याचे प्रतिवादींनी प्रतिकथन केलेले आहे. त्यासाठी त्यांनी अभिलेखावर दाखल केलेल्या नोंदीवरून असे प्रथमदर्शनी दिसून येते की, सदर दोनही मिळकतींच्या संदर्भातील राजस्व दप्तरी केवळ प्रतिवादी क्र.१ ते ६ यांचे नावाची नोंद करण्यात आलेली असुन, त्यात वादीच्या नावाची नोंद करण्यात आलेली नाही. या संदर्भात प्रतिवादींतर्फे दाखल करण्यात आलेल्या फेरफार नोंदीवरून सदर मिळकती मयत सदाशिव याने विकत घेतल्याचे दिसून येत असल्याचा युक्तीवाद करण्यात आला. मात्र, प्रत्यक्षात सदर नोंदीचे बारकाईने वाचन केले असता असे प्रथमदर्शनी दिसून येते की, सदर फेरफार नोंदी गट क्र. ३४ बाबत असुन, गट क्र.३४ व दावा मिळकत सर्वे क्र.८४ व ८९/१ या एकच मिळकती असल्याचे दर्शविणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा प्रतिवादींतर्फे अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. मात्र, ही बाब देखील लक्षणीय आहे की, स्वत: वादीने देखील सदर दोन्ही मिळकती वडिलोपार्जीत मिळकती असल्याचे दर्शविणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. हक्कसोडपत्राच्या दस्ताकडे माझे लक्ष वेधून वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आलेला आहे की, त्यामध्ये सदर मिळकती

देखील वडिलोपार्जीत मिळकती असल्याचे नमुद करण्यात आलेले असल्यामुळे त्या मिळकती वडिलोपार्जीत असल्याचे स्पष्ट होते. मात्र, सदर युक्तीवादात मला प्रथमदर्शनी तथ्य आढळून येत नाही. कारण, प्रथम म्हणजे सदर दस्तातील मजकुर प्रथमदर्शनी संभ्रम निर्माण करणारा आहे. त्यात प्रतिवादी क्र.४ ते ६ या देखील समाविष्ट असल्यामुळे व त्यांचे वडिल सदाशिव मयत असल्यामुळे त्यांच्या दृष्टीने दावा मिळकत सर्वे क्र.८९/१ व ८४ वडिलोपार्जीत मिळकतीच ठरतात. दुसरे म्हणजे सदर दस्तासोबत असलेल्या सात बारा उता-यांमध्ये देखील वादीच्या नावाची नोंद नसल्याचेच प्रथमदर्शनी दिसून येते. सबब, मी या प्रथमदर्शनी निष्कर्षावर आलेलो आहे की, दावा मिळकतींपैकी सर्वे क्र. १३/२ व ३१ या वडिलोपार्जीत मिळकती असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असले तरी, दावा मिळकत सर्वे क्र.८४ व ८९/१ या देखील वडिलोपार्जीत मिळकती असल्याचे अभिलेखावर दाखल दस्तांच्या आधारे सिध्द करण्यास वादीस प्रथमदर्शनी अपयश आलेले आहे. तसेच कथीत हक्कसोडपत्राचा लेख प्रथमदर्शनी संभ्रम निर्माण करणारा असल्याने व प्रथमदर्शनी प्रतिवादी क्र.१ ते ६ त्रयस्थांचे हितसंबंध निर्माण करण्याच्या प्रयत्नात असल्याची वादीची भिती साधार असल्याचे दिसून येत असल्यामुळे, निदान दावा मिळकतींपैकी सर्वे क्र.१३/२ व सर्वे क्र.३१ बाबत तरी वादीस प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे दिसून येत असल्याच्या निष्कर्षावर मी आलेलो आहे. सबब, सदर चर्चेच्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष अंशत: होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.२ व ३ बाबत** (अपरिमीत नुकसान व न्यायाचे समतोलत्व)

९. मुद्दा क्र.१ वरील निष्कर्ष नोंदवितेवेळी मी हे पुर्वीच नमुद केलेले आहे की, वादीस निदान दावा मिळकत सर्वे क्र.१३/२ व ३१ बाबत तरी प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे सिध्द करण्यास ती समर्थ ठरलेली आहे.

सबब, त्या मिळकतींबाबत संरक्षण मिळण्यास वादी पात्र ठरते. अन्यथा प्रतिवादी दावा मिळकतींमध्ये त्रयस्थांचे हितसंबंध निर्माण करतील. त्यामुळे वादीचे अपरिमीत नुकसान संभवते. सदर मिळकतींबाबत तात्पुरता मनाई हुकुम पारीत केल्याचे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्यामुळे निश्चितच न्यायाचे समतोलत्व देखील वादीच्याच लाभात झुकते. सबब, मी मुद्‌दा क्र.२ व ३ यांचा निष्कर्ष देखील अंशत: होकारार्थी नोंदवित असुन, मुद्‌दा क्र.४ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी क्रमांक ५ वरील अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२. वादीने दावा मिळकतींपैकी सर्वे क्र.८९/१ व ८४ या मिळकतींबाबत केलेली तात्पुरत्या मनाई हुकुमाची विनंती नाकारण्यात येवून सर्वे क्र.१३/२ व ३१ या मिळकतींबाबत तीने केलेली तात्पुरत्या मनाई हुकुमाची विनंती मंजुर करण्यात येते व त्याअनुषंगाने सदर दाव्याचा अंतीम निकाल लागे पावेतो प्रतिवादी क्र.१ ते ७ यांना दावा मिळकतींपैकी सर्वे क्र. १३/२ व ३१ या मिळकतींमध्ये त्रयस्थाचे हितसंबंध निर्माण करण्यापासुन तात्पुरत्या मनाई हुकुमाद्वारे प्रतिबंधीत करण्यात येत आहे.

३. दोन्ही पक्षांनी आदेशाची नोंद घ्यावी.

४. आदेश खुल्या न्यायदान कक्षात सांगितला व घोषीत केला.

कुही
दिनांक : १५.१२.२०१४.

(एस. आर. निकम)
सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
कुही.